RH-1516

Metro Econ Poop.

PRINT ISSN:2319-5789, ONLINE ISSN:2320-3145

# SCHOLARS WORLD

International Refereed Multidisciplinary Journal of Contemporary Research

*SPECIAL ISSUE III (OZER COLLEGE) DECEMBER 2015*

## IMPACT FACTORS

**Universal Impact Factor = 1.2242**
**International Impact Factor Services = 0.654**
**Scientific Journal Impact Factor = 3.552**
**Global Impact Factor =0.311**

## INDEXING

**Directory Of Open Access Journals, Sweden**
**Ulrich's Web-global Series Directory, USA**
**Open J-Gate, India**
**Advanced Science Index (ASI), Germany**
**Cite Factor- Academic Scientific Journal- Canada/USA**
**Academic.edu - Share Research- USA**
**Academic Keys- Unlocking Academic Careers**
**Yampu - Switzerland**

**Organised by**

Maratha Vidya Prasarak Samaj's

**Arts, Science and Commerce College, Ozar (Mig)**

Tilak Nagar, Mumbai - Agra Highway, At Post Ozar (Mig) Tal: Niphad, Dist: Nashik, Maharashtra- 422 206

Affiliated to Savitribai Phule Pune University
U.G.C. Recognition 2 (F), 12 (B)



MAAZ PUBLICATIONS

## EDITORIAL BOARD

| EDITOR IN CHIEF | EDITOR |
|---|---|
| DR. MOHAMMED YAHYA SABA,<br>KIRORI MAL COLLEGE- DELHI<br>DELHI UNIVERSITY (INDIA) | DR. MANOJ KAMAT,<br>SR. FACULTY AT VVM'S SHREE DAMODAR COLLEGE- Goa<br>(GOA UNIVERSITY)-INDIA |

### MANAGING EDITOR

ISHTIYAQUE AHMED - (India)

### ASSOCIATE EDITORS:

| | |
|---|---|
| *RAMEL D. TOMAQUIN, Ph.D., DPA,*<br>*DEAN, CAS SURIGAO DEL SUR STATE UNIVERSITY*<br>*TANDAG CITY SURIGAO DEL SUR, PHILIPPINES* | *BHANU SHRESTHA*<br>*ASSISTANT PROFESSOR*<br>*KWANGWOON UNIVERSITY,*<br>*SEOUL, KOREA* |
| *PROFESSOR. NAWAB ALI KHAN*<br>*AL- KHARJ SALMAN BIN ABDULAZIZ UNIVERSITY*<br>*(KINGDOM OF SAUDI ARABIA)* | *DR. R. S. DEORE*<br>*VICE PRINCIPAL*<br>*M.S.G COLLEGE- MALEGAON (CAMP)-INDIA* |
| *DR. HAJJAH JARIAH MOHD JAN*<br>*DEPUTY DEAN*<br>*UNIVERSITY OF MALAYA, MALAYSIA* | *PROFESSOR JACINTA A.OPARA, PHD*<br>*(AUSTRIA)* |

### MEMBERS OF EDITORIAL BOARD (INTERNATIONAL)

| | | |
|---|---|---|
| *DR. LOO FUNG YING,*<br>*Senior Lecturer,*<br>*University of Malaya, , Malaysia* | *DR. LOO FUNG CHIAT,*<br>*Faculty of Human Ecology,*<br>*University Putra Malaysia, Malaysia* | *RÉAGAN (EDITH) Lorraine Lavorata,*<br>*Instructor, Bilingual Higher Ed Business- France* |
| *JOHN KAISER S. CALAUTIT,*<br>*Ph.D, School of Civil Engineering, University of Leeds,*<br>*Leeds LS2 9JT- UK* | *ANJALI HANS,*<br>*Lecturer (English) in Community College, University of Dammam Saudi Arabia* | *RAMADAN ELAIESS, PH.D,*<br>*Assistant professor, Dept. of information studies, University of Benghazi- Libya* |
| *MOHAMMAD ABAEE SHOUSHTARY,*<br>*Isfahan (Iran)* | *DJEBBARI ZAKIA,*<br>*Lecturer, University of Tlemcen- Algeria* | *DR. SUMA PARAHAKARAN,*<br>*Lecturer, Wawasan open University (Penang) Malaysia* |
| *BENSAFI ABD-EL-HAMID,*<br>*Associate Professor, Department of Chemistry and Physics,*<br>*Faculty of Sciences, Abou Bekr Belkaid, University of Tlemcen-Algeria* | | |

### MEMBERS OF EDITORIAL BOARD (NATIONAL)

| | | |
|---|---|---|
| *DR. BEERAN MOIDIN B. M,*<br>*Director and Professor,*<br>*P.A.College of Engineering, Karnataka India* | *DR. SUNIL KUMAR MISHRA,*<br>*Associate Professor, DRONACHARYA COLLEGE OF ENGINEERING,*<br>*Gurgaon- India* | *DR. M. JAYA,*<br>*Head, Department of Commerce, Asan Memorial College of Arts & Science, Chennai- India* |
| *DR. K. ABDUL GAFOOR,*<br>*Head & Associate Professor in Education, University of Calicut, Calicut- India* | *DR. C.M. NIKAM,*<br>*HOD, , M.S.G. College of Arts, Science & Commerce, Malegaon Camp- Nasik- Maharashtra- India* | *DR. ARTEE AGGRAWAL,*<br>*Director, Academics Prakritim Business School, Mumbai- India* |
| *DR.B.R. VENKATRAMAN,*<br>*Associate Professor, Post Graduate & Research Department of Chemistry,Periyar E.V.R.College (Autonomous)Tiruchirappalli,T. Nadu- India* | | |

| | | |
|---|---|---|
| 44. | WOMEN'S POPULATION PARTICIPATION IN POLITICS: A CASE STUDY OF NIPHAD TAHSIL FROM NASHIK DISTRICT, MAHARASHTRA<br>*D.S. GODAGE* | 224-227 |
| 45. | नंदूरबार जिल्ह्यातीलग्रामीण जन्मदराचा आकृतीबंध<br>आशा एम. काटे, छाया एस.गावित | 228-234 |
| 46. | जळगांव जिल्हयातील पीक तीव्रतेचे भौगोलिक विश्लेषण<br>प्रफुल्ल सुधाकर ठाकरेए . डी.एस.सूर्यवंशी | 235-240 |
| 47. | शाश्वत कृषी बिकास काळाची गरज<br>शशिकांत तोळमारे | 241-243 |
| 48. | आदिवासी जिल्ह्यातील मर्त्यतेच्या अभ्यासाचा भौगोलिक दृष्टीकोन<br>छाया एस.गावित,आशा एम. काटे | 244-251 |
| 49. | "सटाणा तालूक्यातील दुर्लक्षीत किल्ल्यांचा पर्यटनाबाबत दृष्टीक्षेप"<br>आर. एच. ठाकरे | 252-255 |
| 50. | जागतिकीकरनाचा महाराष्ट्रातील शेतीवरील दुष्परिणाम आणि शेतकरी आत्महत्या: एक भौगोलिक अभ्यास<br>पंकज युवराज शिंदे, सुरेश कौतिक शेलार | 256-259 |

Online: ISSN 2320-3145, Print: ISSN 2319-5789

# सटाणा तालूक्यातील दुर्लक्षीत किल्ल्यांचा पर्यटनाबाबत दृष्टीक्षेप

आर. एच. ठाकरे

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओझर (मि.), ता. निफाड, जि. नाशिक.

**स्तावना:**

ारतात प्राचिन काळापासून पर्यटकांना आकर्षित केले जात आहे. भारत बहुधार्मिक आणि बहुसांस्कृतिक देश असल्याने अभ्यासासाठी सर्ग सानिध्यात राहण्यासाठी परदेशातूनही पर्यटक येतात. संयुक्त राष्ट्राच्या रोम येथील १९६३ मधील आंतरराष्ट्रीय यात्रा आणि पर्यटन ने केलेल्या वर्णनानुसार कोणतीही व्यक्ती ही इतर देशात आनंद घेण्यासाठी, सुट्टी घालविण्यासाठी, आरोग्य ठिक करण्यासाठी, पार बैठकांसाठी अथवा अभ्यास व इतर उद्देशासाठी इतर देशात २४ तास थांबत असेल तर त्याला पर्यटक म्हटले जाते. भारत रकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या अहवालानुसार २०१२-१३ मध्ये पर्यटनाचा GDP ६.८८ % आहे. तर वर्ड ट्रॅव्हल ॲन्ड टुरिझम यांचे मते ०२१ मध्ये GDP ८.८ % वर जाईल असा अंदाज आहे. तर १२ व्या पंचवार्षिक योजनेत हा दर ९.१ % साध्य करण्याचा प्रयत्न आहे. ती, उद्योग, सेवा क्षेत्र या प्रमाणे पर्यटन क्षेत्राचा विकास करणे हे खुपच महत्त्वाचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून नदी, गरी किनारपट्टी, डोंगर, दऱ्या, किल्ले, गड, पठारे, थंड हवेची ठिकाणे यांना महत्त्व आले व आज या स्थानांचे पर्यटन स्थळे ही झाले हेत. परंतु अद्यापही काही स्थळे दुर्लक्षीत आहेत.

**द्देश्ये:-** दुर्लक्षीत दरेमाळ आणि पिसोळ किल्ला या स्थळांची पर्यटन स्थळे म्हणून विकासाची शक्यता तपासणे.

**शोधन पध्दतीचे साधने:-** क्षेत्रभेट, निरीक्षण, मुलाखत, पुस्तक संदर्भ, गव्हर्मेन्ट गॅझेट.

**भ्यास क्षेत्र:-**

१. दरेमाळ किल्ला- गाव- बिलपुरी क्षेत्र १४३९.३५ लोकसंख्या १०१६ , ता. बागलाण, जि. नाशिक. सह्याद्रीच्या उपरांगेत नाशिक (महाराष्ट्र) जिल्ह्याच्या उत्तर सीमा रेषेवर २०°५०'४३" N ७४°१८'१२" E लॅटीट्युड वर.
२. पिसोळ किल्ला- गांव नांदिन क्षेत्रफळ ७९५ हेक्टर, लोकसंख्या १९२०, ता. बागलाण, जि. नाशिक. (महाराष्ट्र)

ाद्रीच्या उप रांगेत २०.५८° N ७४.२२° E लॅटीट्युड वर नाशिक जिल्ह्याची उत्तर सीमा रेषेवर.

**भोवतालची गावे व अंतर**

| अ. क्र. | दरेमाळ जिल्ह्यापासून अंतर (कि. मी.) | गावाचे नांव | पिसोळ किल्ल्यापासूनचे अंतर (कि.मी.) |
|---|---|---|---|
| १. | ११२.५ | नाशिक | ११८.५ |
| २. | ३३.६ | सटाणा | ३८.४ |
| ३. | १३.४ | नामपूर | १८.५ |
| ४. | १२.३ | जायखेडा | ८.३ |
| ५. | ४.८ | तळवाडे | ८.७ |
| ६. | ५.५ | श्रीपुरवडे | ६.२ |
| ७. | ६.२ | दिघावे | २.३ |
| ८. | ३.२ | बोढरी | १०.२ |
| ९. | १.२ | बिलपुरी | ११.३ |
| १०. | ५.५ | चिराई | १२.५ |

Online: ISSN 2320-3145, Print: ISSN 2319-5789

**हवामान:**

देरमाळ किल्ला आणि पिसाळ किल्ला या दोन्ही ठिकाणी मे ३७.४° c पर्यंत तापमान असते तर डिसेंबर मध्ये १०° c थंड असते. कमाल तापमान ३२° c तर किमान १७.८° c असून जुन ते सप्टेंबर पाऊस असतो. या किल्ल्यावर पावसाळ्यात दाट धुके असते व डोंगरांवर पाऊसाची रिप-रिप चालू असते. उन्हाळ्यात मात्र पाण्याची कमतरता असते.

**विषय विवेचन :**

मोगल काळात बागलाण हा खान्देशचा जिल्हा होता. शिवाजी महाराजांनी सुरत लुट केली ती लूट देखील खाल्हेर -मुल्हेर मार्गेच रावगडावर पोहच केली. त्यात त्यांची सुरंक्षतता होती. १६७१ मध्ये राजेंनी साल्हेरचा किल्ला ताब्यात घेतला तेव्हापासुन मराठयांचे खाल्हेर -मुल्हेर, तांबोला, रतनगड, शेंदवड, हनुमान गड, खालोटा, हतगड पिसोळ, देरमाळ हे किल्ले- गड- पठारे, महत्वाची ठिकाणे होती व हे सर्व स्थाने सहयाद्रीच्या उपरांगेत आहेत. बागलाण तालुक्यात एकुण ३० परगाने होते देरमाळ किल्ला व पिसोळ किल्ला त्याचा जवळचे सर्व गावे ही सांडस- मोराणे या परगाण्यात होते. या किल्लांच्या परीसरात मराठा, मुसलमान, खान, भिल्ले, कोकणी व इतर जमातीचे लोक राहत असुन त्याची उपभाषा ऐरानी आहे. हिंदू संस्कृती नुसार सर्व सण- उत्सव घेतले जात होते व त्या बरोबर अफुचे उत्पादन घेतले जाते होते व हा अफु साल्हेर मार्गे अंदमान -निकोबार बेटांवर पोर्तुगील व्यापार करीत असत व तो निर्यात ही करीत होते. आज मात्र या क्षेत्रामध्ये ५०.३९ टक्के जंगल भाग असुन उर्वरीत उंच सखल शेती क्षेत्रात बाजरी, भुईमुग, मका, कडधान्य, डाळींब, कांदे, गहु, इत्यादी पिके घेतली जात आहेत. या दोन्ही स्थानाच्या पश्चिमेलाच मांगी-तुंगी, खाल्हेर -मुल्हेर ही क्षेत्र असुन जवळच गुजरात या डांग जिल्हा सुरु होतो.

देरमाळ किल्लावर मोठ मोठया पाण्याच्या टाक्या तयार केल्या आहेत त्यात बाराही महिने पाणी असते. बाजुला मोठा कडा असुन त्यात हलक्या वस्तु टाकल्या तर हवेचा प्रवाहीदाबाने त्या वस्तु वर येतात ती एक जादुई मजा वाटते. वर पठारावर मैदानासारख्या भाग असुन पुर्व डोंगर शेत निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे.

पिसोळ किल्लाला नांदीनचा किल्ला असे नेहमीच्या बोलीभाषेत म्हटले जाते. या किल्लाच्या अवती भवती १६११ पर्यंत भिल्ल व कोकणी समाजाचे लोक मोठया प्रमाणावर राहत होते. आता सर्व समाजाचे लोक नांदीन गावात राहतात. या किल्लाच्या वर गुहा, जुन्या काळातील बुरुज पाण्याच्या टाक्या व मोठे मोठे कडे आहेत. या दोन्ही स्थानात निसर्गरम्य परीसर असुन वनौषधाचा खजिना ही आहे. या स्थळावर अंजन, सायफळ, मोदळ, सादडा, धामडा, कंसार, टेंभुर, बोरं, सिताफळ इत्यादी झाडे असुन हे फट आतोनी, करवंद, व इतर छुडपे असुन वनौषधे वेली आहे. पावसाळयात खली, नल्दा,मध, डिंक, ससे, लावटी, तिमर, जंगली मेसा याचा काहीचा उदर निर्वाह कटोर्ले तसेच विविध रान फुले दिसुन येतात. पुर्वी या किल्लाच्या जवळचे गोव सिताफळ लिलाव देत होते परंतु आता फॉरेस्ट स्कीम मुळे जंगल वाढले आहेत व वाघ, तरस, लांडगे, कोल्हे, रानडुक्कर, सरपटणारे प्राणी यामुळे भिती वाटते म्हणुन हा लिलाव घेणे ही बंद केले आहे या दोन्ही स्थानावरुन उत्तरेकडे धुळे जिल्हा व दक्षिणेकडे नाशिक जिल्हा यांचे दुरपर्यंत खुपच छान विहंगत दृश्य पाहुन डोळयाचे पारणे फिटते. या दोन्ही स्थानांवर आजुबाजुला परिसरातील विदयार्थी, निसर्ग प्रेमी आवर्जुन येतात मात्र आपल्या घरी परत जातांना प्रत्येकाच्या मनात येते की, या स्थळांचा विकास होणे खुपच महत्वाचे आहे.

**महत्व :**

१) **नावलौकीक :** या दोन्ही क्षेत्रांचा पर्यटन स्थळ म्हणुन विकास झाला तर त्या क्षेत्रात नाव लौकीक होईल.

२) **रोजगार :-** या भागात जंगल संपत्ता भरपुर असल्यामुळे अनेकांचा उदरनिर्वाह जंगलावर होतो परंतु पर्यटन स्थळ म्हणुन विकसीत झाले तर रोजगार निर्मिती अधिक होईल.

३) **उदयोग व्यापार वाहतुकीची साधने:-** लहानमोठे, व्यवसाय, उदयोग यांची निर्मीती होणेस मदत होईल.

४) **ऐतिहासीक ठेवा व अध्ययन :** हे दोन्ही स्थानाना ऐतिहासीक वारसा असुन तो जतन होईल व संशोधकांना अध्ययन करण्यास मदत होईल.

५) **महसुल वाढ:** पर्यटनातुन मानसिक समाधान तर मिळतेच परंतु त्याच बरोबरीने देशांतर्गत व देशा बाहेरील पर्यटनामुळे सरकारी महसुल देखील वाढले.

६) **रस्ते विकास फायदा :** पर्यटन स्थळासाठी रस्ते, विदयुत, पाणी अशा सोयी होतील त्याचा फायदा सगळयांना होईल तसेच एस. टी. रेल्वे, व इतर वाहतुकदार वर्ग, संस्था यांचे उत्पन्न वाढेल.

**समस्या :**

१) **वाहतुक समस्या :** पिसोळ किल्ला व देरमाळ किल्ला हा स्थानापर्यंत जाणेसाठी अदयाप ही कच्चा रस्ता आहे. तो डांबरीकरण होणे गरजेचे आहे तसेच या भागात काही ठिकाणी मोबाइल सेवा खंडीत होते म्हणुन मोबाईल टावर उभारणे गरजेचे आहे.

Online: ISSN 2320-3145, Print: ISSN 2319-5789

२) **विदयुत :-** संबंधीत स्थानाच्या जवळच्या गावामध्ये विदयुत पुरवठा आहे व तो सिंगल फेज लाईनमुळे गावात सतत विदयुत असते मात्र किल्ल्यावर रात्री पहारा आणि पण ती सोय नाही.

३) **पाणी :** या क्षेत्रामध्ये पावसाळ्यात भरपूर पाऊसामुळे पाण्याचा प्रश्न येत नाही परंतु साधारणात फेब्रुवारी ते जून या काळात पाण्याचे दुर्लक्षीत असतात पावसाळ्यातील पाणी साठविण्यासाठी जंगलात लहान मोठे तलाव, बंधारे करणे आवश्यक आहे

४) **माहितीचा अभाव:** आजूबाजूच्या अनेक गावामध्ये त्याच्याच जवळ असलेल्या या ऐतिहासीक स्थळांची माहिती नाही त्याचा अभ्यास केलेला नाही अनेक ठिकाणी माणसी अडचण येते.

५) **जंगली पशु श्वापदे :** अलीकडच्या काळात जंगलात बिबटे, तरस, लांडगे, कोल्हे, रानडुक्कर, याचा वावर मोठया प्रमाणात वाढला आहे त्याच्यापासुन सरक्षण मिळणे आवश्यक आहे.

६) **चोरी :** गुराखी, जंगलावर उदरनिर्वाह करणारे व इतर हे सतत जंगलातील चांगले वृक्ष, ऐतिहासीक ठेवा, वनोषधी वस्तु वनस्पती, पशु-पक्षी इत्यादी बाबत गैरमार्गाचा वापर करतात यामुळे राष्ट्रीय संपत्तीचा ऱ्हास होतो.

७) **प्रचार व प्रसार :-** पर्यटनासाठी अत्यंत चांगल्या अशा या स्थानाचा प्रचार व प्रसार करणे आवश्यक आहे.

## पर्यटन विकासासाठी अपेक्षीत उपाययोजना:

१. **रस्ते सुविधा:-** या स्थळांपर्यंत जाण्यासाठी पक्के, डांबरी, सिमेंटचे रस्ते होणे गरजचे आहे. किल्ल्यांच्या पायथ्यावर असलेल्या गावापर्यंत रस्ते आहेत. परंतु येथून पुढे रस्ते नसल्यामुळे पर्यटकांना त्याचा त्रास होतो. लहाण मुले, हौसी पर्यटक यांची इच्छा असुन जाता येत नाही. या ठिकाणी डोली, खेचर, रोपवे अशा सोई नाहीत. योग्य ठिकाणी रोपवे करणे देखील आवश्यक आहे.

२. **मोबाईल सुविधा:-** या किल्ल्यांवर व पायथ्याच्या गावांमध्ये मोबाईल रेंज येण्यासाठी टावर बसविणे आवश्यक आहे.

३. **विद्युत:-** या पर्यटन स्थळांवर व पायथ्यांच्या गावांमध्ये सतत विद्युत पुरवठा असणे महत्त्वाचे आहे. यामुळे पहाटे व अंधारात त्रास होणार नाही.

४. **प्रसार:-** ग्रामस्थ, विद्यार्थी, पर्यटन, लोक प्रतिनिधी, इतिहासकार, लेखक यांनी या स्थळांचा जास्तीत जास्त प्रसार करावा.

५. **जंगली पशुंपासुन संरक्षण:-** या किल्ल्यांभोवती जंगल मोठ्या प्रमाणात असून वन खात्यांमार्फत जंगली पशूंपासून पर्यटकांना संरक्षण देणे आवश्यक आहे. अलीकडे बिबटे, तरस, लांडगे, रानडुक्कर यांचा वावर मोठ्या प्रमाणात झाला आहे.

६. **जंगलतोड रोखणे:-** पर्यटन स्थळ आणि आजूबाजूच्या जंगलातून महत्त्वाच्या झाडांची चोरुन तोड होत असते. जंगल व वने विभागाने योग्य कारवाई करणे.

७. **शासनाकडून प्रयत्न:-** शासन स्तरावरुन, एम.टी.डी.सी., आय.टी.डी.सी. यांच्याकडून पर्यटनक्षेत्र विकासासाठी निधी व इतर कामे होणे गरजेचे आहे.

८. **निवास व्यवस्था:-** शासन स्तरावरुन या पर्यटन स्थळांजवळ गेस्ट हाऊस बांधणे आवश्यक आहे, कारण पर्यटकांना, अभ्यासकांना जवळ राहण्याची सोय नाही.


९. **सुशिक्षीतांना संधी:-** या पर्यटन स्थळाच्या आजूबाजूच्या गावातील सुशिक्षीत तरुनांनी पर्यटक कसे आकर्षित होतील याबाबत प्रयत्न करुन त्यांना योग्य माहिती द्यावी. गाईड म्हणुन कार्य यातून रोजगार वाढण्यास चालना मिळेल.


## समारोप :


पिसोळ व दरेमाळ किल्ल्याचा समस्यांचे निराकरण स्थानिक नागरीक, प्रशासन, राजकीय, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, सरकार, एम. टी. डी. सी. आय. टी. डी.सी., इतिहासकार, पर्यटनप्रेमी, इत्यादनी करण्यास मदत केली तर हे दोन्ही स्थळे सुंदर पर्यटन स्थळे निर्माण होतील त्याचा सर्व घटकांना फायदा होईल व आर्थिक विकासाला ही मदत होईल.


## संदर्भ:

१) बागलाण इतिहास : प्रा. एस. के. कापडणीय
२) गव्हर्नमेंट ऑफ इंडीया (१९९४) गॅझेट, नाशिक.
३) डिस्ट्रीक. सेन्सस, हॅन्डबुक-२.
४) दै. पेपर
५) वेबसाईट
६) योजना, मासिक.


पिसोळ


डेरमाळ


FORT PISOL


FORT DERMAL

----